स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेतील अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी विद्यापीठाकडे सादर करावयाचा

संशोधन पूर्व आराखडा

विषय

नाशिक जिल्ह्याच्या विविध तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास (२०११-१२ ते २०२१-२२)

संशोधक

श्री महादेव राजेंद्र क्षीरसागर

मार्गदर्शक

डॉ. अनिल दिगंबर वाडकर

(एम.ए. पीएच.डी.) अर्थशास्त्र विभाग प्रमुख

श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा. जि. लातूर

संशोधन केंद्र

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, उप परिसर, लातूर

नाशिक जिल्ह्याच्या विविध तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास (२०११-१२ ते २०२१-२२)

१.१ प्रास्ताविकः -

दारिद्रय ही जगातील सर्वच देशापुढील एक भीषण सामाजिक समस्या आहे. देशाच्या सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकासात दारिद्रय हा मोठा अडथळा आहे. दारिद्रयाचे निर्मुलन करण्यासाठी विविध शासकीय योजनांच्या माध्यमाने मोठ्या प्रमाणात निधी खर्च करावा लागतो. यामुळे शासकीय खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होत असते. मात्र शासकीय खर्चानंतरही दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील व्यक्ती विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहात असल्याचे दिसते. यामुळे दारिद्रयाची समस्या देशाला भेडसावत असते. दारिद्रय निश्चित करण्यासाठी 'दारिद्रयरेषा' या काल्पनिक मापनाचा वापर करण्यात येतो. जगातील दारिद्रयाचे निकष जागतिक बँकेद्वारा निर्धारित केले जातात. दारिद्रयाचे मापन करण्यासाठी क्रयशक्ती समता दराचा उपयोग करण्यात येतो. या आधारे २००८ मध्ये दारिद्रय रेषा निश्चित करण्याचा निकष १.२५ अमेरिकन डॉलर असा होता. यात २०१५ मध्ये संशोधन करून १.९० अमेरिकन डॉलर असा निकष निश्चित करण्यात आला. नव्या निकषाच्या आधारे जागतिक बँकेने अंदाज केला आहे की २०१५ पर्यंत जगामध्ये ७०० दशलक्षापेक्षा अधिक लोक दारिद्रयात जीवन व्यतीत करत होती. जगात सर्वाधिक दारिद्रय आफ्रिका खंडातील देशात आहे. जागतिक बँकेच्या २०१५ मधील निकषाच्या आधारावर आफ्रिकेतील मादागास्कर या देशात ७७.६% एवढी लोकसंख्या दारिद्रयरेषेखाली होती.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशाची एकूण लोकसंख्या ३४ कोटी होती. या लोकसंख्येपैकी सुमारे १९ कोटी लोकसंख्या दारिद्रयात जीवन जगत होती. तत्कालीन शासनाने देशाच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनाचा मार्ग स्वीकारला व पंचवार्षिक योजनांच्या माध्यमाने पुढील आर्थिक व सामाजिक समस्यांची सोडवणूक करण्याची प्रक्रिया सुरु केली. देशात कृषी क्षेत्राचा व औद्योगिक क्षेत्राचा विकास झाल्यास देशापुढील आर्थिक व सामाजिक समस्यांची सोडवणूक होईल असा शासनकर्त्यांचा व नियोजनकर्त्यांचा अंदाज होता. पण या अंदाजाला पूर्ण यश मिळाले नाही, कारण दारिद्रयाची स्थिती कमी करण्यात शासनाला यश मिळाले नाही. स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या पहिल्या दशकापर्यंत देशातील दारिद्रयाच्या समस्येवर शासन फारसे गंभीर नव्हते. म्हणून १९६० च्या दशकापर्यंत भारतात दारिद्रय निर्मूलनासाठी शासन स्तरावरून प्रयत्न करण्यात आले नाहीत.

१९६० च्या दशकात भारतात दारिद्रयाची समस्या सोडविण्यासाठी शासनाला पुढाकार घ्यावा लागला. देशातील दारिद्रयाची स्थिती व प्रमाण किती आहे, हे जाणून घेण्यासाठी देशाच्या नियोजन आयोगाकडे जबाबदारी सोपविण्यात आली. त्या अनुषंगाने दारिद्रयाचे मापन करण्याचे कार्य नियोजन आयोगाकडे सोपविण्यात आले. नियोजन आयोग विशिष्ट कालावधीनंतर कार्यकारी गटाची स्थापना करून दारिद्रय मोजमापाचा निकष ठरविते. १९६० च्या दशकात दारिद्रयाच्या भीषण समस्येवर उपाय योजण्याच्या उद्देशाने १९६२ मध्ये 'दारिद्र्यरेषा' निश्चित करण्यासाठी नियोजन आयोगाने कार्यकारी गटाची स्थापना केली. या गटाचे अध्यक्ष प्रा. डी. आर. गाडगीळ हे होते, यांच्यासोबत डॉ. बी. एन. गांगुली, डॉ. पी. एस. लोकनाथ, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, एम. आर. मसानी, अशोक मेहता, पितांबर पंत, डॉ. वी. के. वी आर. राव आणि श्रीमन्ननारायण या सदस्याचा समावेश होता. या कार्यकारी गटाने देशातील दारिद्रयरेषा निश्चित करण्यासाठी निकष ठरविला. यानंतर देशात दारिद्र्य निर्मुलणासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती निर्माण झाली. केंद्र सरकारने नियोजन आयोगाच्या माध्यमाने १९७७ मध्ये डॉ. वाय. के. अव्हा यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी गटाची स्थापना केली. १९९३ मध्ये प्रा. डी. टी. लकडावाला, २००९ मध्ये प्रा. सुरेश डी. तेंडुलकर व २०१४ मध्ये डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी गटाची स्थापना करून देशातील दारिद्रय मोजण्यासाठी नवीन निकष निश्चित केलेला आहे.

प्रा. सुरेश तेंडूलकर यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी गटाने २०११-१२ या वर्षातील किंमत पातळी विचारात घेऊन ग्रामीण भागातील एका व्यक्तीला २७.२ रु व शहरी भागातील व्यक्तीला ३३.३ रु. म्हणजेच ग्रामीण भागातील एका व्यक्तीला मासिक ८१६ रु. व शहरी भागातील एका व्यक्तीला मासिक १००० रु. हा दारिद्रयाचा निकष निश्चित करण्यात आला. या निकषाच्या आधारे २०११-१२ मध्ये भारतात ग्रामीण भागात २५.७% जनता तर शहरी भागात १३.७% जनता दारिद्रय रेषेखाली होती. यानुसार देशातील दारिद्रयाचे प्रमाण २१.९% एवढे होते. डॉ. सी. रंगराजन यांच्या कार्यकारी गटाने २०११-१२ मधील किंमत पातळी विचारात घेऊन ग्रामीण भागातील व्यक्तीला एक दिवसाला ३२.४ रु. व शहरी भागातील व्यक्तीला ४६.९ रु म्हणजेच ग्रामीण भागातील व्यक्तीला मासिक ९७२ रु व शहरी भागातील व्यक्तीला मासिक १४०७ रु. हि उत्त्पन्न मर्यादा दारिद्रय मापनासाठी निश्चित करण्यात आली. या निकषाच्या आधारे २०११-१२

मध्ये भारतात ग्रामीण भागात ३०.९ तर शहरी भागात २६.४% जनता दारिद्र्य रेषेखाली होती. या निकषाच्या आधारे देशातील एकूण दारिद्र्यचे प्रमाण २९.५% एवढे होते.

महाराष्ट्र हे देशातील आर्थिक शक्तीचे केंद्र आहे. महाराष्ट्र हे कृषी व औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य महणून ओळखले जाते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकीत्सक अभ्यास केला असता असे स्पष्ट झाले आहे की, ज्या देशाचा किंवा राज्याचा आर्थिक विकास हा नवतंत्रज्ञानाचा वापर करून झालेला आहे, अशा देशात गरीब किंवा दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना जीवन जगण्यासाठी अधिक संघर्ष करावा लागतो. कारण वाढती महागाई व असंघटित क्षेत्रात रोजगार मिळवण्याची चुरस अधिकच जीवघेणी ठरते. यामुळे दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना खूप संघर्ष करावा लागतो, या लोकांमध्ये तांत्रिक कौशल्य नसल्यामुळे बौद्धीक रोजगाराच्या संधीपासून वंचित राहावे लागते. यांना केवळ शारीरिक कष्टाची कामे करावी लागतात. कौशल्य कमी म्हणून रोजगार मूल्यही कमी असते. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना आर्थिक सामाजिक समस्यांचा सामना करावा लागतो. डॉ. सी. रंगराजन कार्यगटाच्या अहवालानुसार २०१४ च्या किंमत पातळीचा विचार करून महाराष्ट्रातील ग्रामीण भागात २२.५% जनता दारिद्र्यरेषेखाली होती तर शहरातील १७% जनता दारिद्यात होती म्हणजेच महाराष्ट्रात २०% जनता दारिद्रय रेषेखाली होती. एकूण लोकसंख्येत २०% टक्के जनता किमान मूलभूत गरजांची पूर्तता करू शकत नाही हे कृषी व औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्याच्या दृष्टीने भूषणावह नाही. यासाठी बदललेल्या आर्थिक सामाजिक समीकरणात दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींच्या आर्थिक सामाजिक स्थितीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

उत्तर महाराष्ट्रातील पौराणिक व ऐतिहासिक दृष्ट्या नावलौकिक असलेला नाशिक जिल्हा आहे. नाशिक जिल्ह्यात सटाणा (बागलाण), सुरगाणा, मालेगाव, देवळा, पेठ, दिंडोरी, चांदवड, नांदगाव, नाशिक, निफाड, येवला, इगतपुरी, सिन्नर, कळवण, त्र्यंबकेश्वर हे १५ तालुके आहेत. सुरगाणा, कळवण, पेठ, सटाणा (बागलाण), त्र्यंबकेश्वर आणि दिंडोरी हे आदिवासीबहुल तालुके आहेत. नाशिक व मालेगाव हे तालुके रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. नाशिक तालुक्यात उद्योगधंदे अधिक प्रमाणात आहेत, तर मालेगाव तालुका सुती कापड निर्मितीचे केंद्र आहे. निफाड, चांदवड, दिंडोरी व नाशिक या तालुक्यात द्राक्षाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. कळवण, देवळा, सटाणा नांदगाव, येवला या तालुक्यात कांदा पिकाचे उत्पादन अधिक प्रमाणात घेतले जाते. म्हणजेच नाशिक जिल्हा

वैविध्यपूर्ण तालुका आहे. मात्र नावलौकिक असणाऱ्या नाशिक जिल्ह्यात लोकसंख्येचे प्रमाण २०११ च्या आकडेवारीनुसार २३.८% आहे. नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची संख्या मालेगाव तालुक्यात आहे. या खालोखाल सुरगाणा, निफाड, त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी या तालुक्याचा क्रम लागतो. जिल्ह्यात सर्वात कमी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची संख्या देवळा तालुक्यात आहे. यानंतर चांदवड व नाशिक या तालुक्याचा क्रम लागतो.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा औद्योगिक तसेच कृषी प्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. नाशिक जिल्ह्यात भौगोलिक व प्राकृतिक विविधता दिसून येते. नाशिक, सिन्नर ओझर या तालुक्यात औद्योगिकीकरण झालेले दिसून येते. निफाड, चांदवड व त्रंबकेश्वर या तालुक्यात द्राक्ष बागांचे उत्पादन अधिक प्रमाणात घेतले जाते. सटाणा, कळवण, सुरगाणा व त्र्यंबकेश्वर हे आदिवासीबहुल तालुके आहेत. येवला व नांदगाव हे कमी पर्जन्यछायेचे तालुके आहेत. देवळा हा कृषिप्रधान तालुका आहे. नाशिक जिल्ह्यात प्राकृतिक व भौगोलिक वेगळेपण असल्यामुळे या तालुक्यातील लोकसंख्येचे वितरणही विषम स्वरूपाचे आहे. नाशिक, सिन्नर व ओझर या तालुक्यांमध्ये औद्योगिकीकरण वेगाने वाढते आहे. मालेगाव तालुक्यात सुती कापड व्यवसाय फार पूर्वीपासून केला जातो. मालेगाव तालुक्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, हा तालुका नाशिक जिल्ह्यात मुस्लिम बहुल तालुका म्हणून ओळखला जातो. नाशिक जिल्ह्यात असलेल्या या सर्व १५ तालुक्यांमध्ये दारिद्रयाचे प्रमाण देखील कमी-अधिक स्वरूपाचे आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनात नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये असणाऱ्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे. यामुळे तालुकानिहाय दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचे वास्तव स्वरूप कळण्यास मदत होईल. व दारिद्रयाचे निर्मूलन करण्यासाठी दारिद्रयाच्या स्वरूपानुसार प्रभावी व परिणामकारक उपाययोजना करणे शक्य होईल. या संशोधनाद्वारे नाशिक जिल्हा हा दारिद्रय मुक्त करण्यासाठी सहाय्यकारी ठरेल.

१.२ विषयाची निवड :-

महाराष्ट्र हे पुरोगामी विचारसरणीचे राज्य म्हणून संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. याच महाराष्ट्राच्या राजधानीला म्हणजेच 'मुंबई' ला देशाची आर्थिक राजधानी असे संबोधले जाते. महाराष्ट्राची ओळख औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य अशी देखील केली जाते. मात्र

येथील लोकसंख्येचा आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला असता लोकसंख्येत आर्थिक व सामाजिक दृष्ट्या विसंगती दिसून येते. उद्योग व्यवसायाशी निगडित व नोकरदारांची स्थिती चांगली आहे. शेतकरीसुद्धा काही अंशी सन्मानाने जीवन जगताना दिसून येतो, परंतु महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून ज्यांच्याकडे उत्पादक स्वरूपाची साधनसामग्री नाही. अशा कुटुंबांना मिळणाऱ्या उत्पन्नातून किमान मूलभूत गरजांची देखील पूर्तता करता येत नाही. अशा दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना दारिद्रयाच्या स्थितीमधून बाहेर काढण्यासाठी शासन विविध शासकीय योजनांची आखणी करून त्यांची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणात करत आहे. यात केंद्रपुरस्कृत योजनांचाही समावेश आहे. शासकीय योजनांचा विचार केला असता, काही योजना वैयक्तिक लाभाच्या आहेत तर काही योजना सामूहिक लाभाच्या आहेत. अशा योजनांचे स्वरूप बदलत्या परिस्थितीनुसार बदलले आहे. निकष बदलले आहेत, लाभार्थी बदलले आहेत परंतु तरीदेखील महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भागात एकूण २०% जनता दारिद्रय रेषेखाली जीवन व्यथित करताना दिसते. आजचे जीवनमान गतिमान झाले आहे. उच्च तंत्रज्ञानाचा वापर अलीकडे मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. यामुळे कामाच्या गुणवत्तेत आणि स्वरूपात गुंतागुंतीच्या परिस्थितीत दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या कुटुंबातील व्यक्तींना कसा संघर्ष करावा लागतो, हे आजच्या परिस्थितीत अभ्यासणे आवश्यक आहे. भारतात मार्च २०२० पासून कोरोना संकट निर्माण झाले आहे. याचा सर्वाधिक फटका दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना बसला आहे. यांना कोरोना काळात जीवंत राहण्यासाठी संघर्ष करावा लागतो आहे, हे वास्तव सत्य आहे.

संबंधित संशोधन विषयाची गरज यासाठी आहे की केंद्र व राज्य शासनाद्वारे गेल्या ६०-७० वर्षापासून दारिद्रय निर्मूलनासाठी धोरणात्मक उपाय योजना करण्यात येत आहेत. कोट्यावधी रुपये दारिद्रय निर्मूलनासाठी खर्च केले जात आहेत. तरीदेखील २०% दारिद्र्य आजही टिकून आहे. यात कोरोना संसर्गाची भर पडल्यामुळे दारिद्रय रेषेखालील व्यक्तींच्या विवंचनेत भरच पडलेली आहे. सदर संशोधनाच्या माध्यमाने नाशिक जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन केल्यानंतर दारिद्रयाच्या वास्तव स्थितीचे अवलोकन होईल. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत बदलत्या परिस्थितीनुसार काय उपाययोजना करता येतील, जेणेकरून दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी व त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात

आणण्यासाठी प्रभावी उपाय योजना सुचविता येतील. असा उदात्त हेतू डोळयासमोर ठेऊन संबंधित संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण नाशिक जिल्हा असून, जिल्ह्यातील १५ तालुक्यामध्ये असणाऱ्या **दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन** करावयाचे आहे. परंतु संशोधकाची क्षमता, वेळ श्रम या मर्यादा विचारात घेता संबंधित संशोधन हे दर्जेदार व उपयुक्त सिध्द व्हावे यासाठी नाशिक जिल्ह्यातील तालुक्यांचे साम्य व भेद या निकषांच्या आधारे दोन गटात वर्गीकरण करून संशोधनासाठी प्रातिनिधिक स्वरूपात तालुक्यांची, गावांची व दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची विभागणी करून प्रातिनिधिक नमुना निवडण्यात येईल.

१.३ नाशिक जिल्ह्याची सर्वसाधारण ओळख :-

महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्याचे स्थान उत्तर महाराष्ट्रात येते. नाशिक जिल्हा हा १९.३३ ते २०.५३ उत्तर अक्षांश व ७३.१६ ते ७५.१६ या पूर्व रेखांशावर येते. जिल्ह्याची उत्तर-दक्षिण लांबी १२० कि. मी. व पूर्व-पश्चिम लांबी २०० कि.मी. आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १५.५३० चौ. कि. मी. आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टिने नाशिक महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकाचा मोठा जिल्हा आहे. नाशिक जिल्ह्याला महाराष्ट्रातील पाच तर गुजरात राज्यातील दोन जिल्ह्याच्या सीमा आहे. जिल्ह्याच्या उत्तरेला धुळे, ईश्यान्येला जळगाव, आग्नेयेला औरंगाबाद, दक्षिणेला अहमदनगर आणि नैकतेला ठाणे जिल्हा आहे. तर गुजरात राज्यातील डांग व सुरात हे नाशिक जिल्ह्याच्या वायव्येला आहेत.

नाशिक जिल्ह्यात एकूण १५ तालुके आहेत. क्षेत्रफळाच्या दृष्टीने मालेगाव तालुका सर्वात मोठा तालुका आहे, तर पेठ हा सर्वात लहान तालुका आहे. सुरगाणा, कळवण, पेठ व बागलान हे डोंगराळ भागातील तालुके आहेत. तसेच हे आदिवासी बहुल तालुके म्हणूनही ओळखले जातात. नाशिक जिल्ह्यात वाणी-नांदुरी येथे आदिशक्ती सप्तशृंगी माता व चांदवड येथे आदिशक्ती रेणुका माता हे प्रसिद्ध देवस्थान आहेत. येथे दरवर्षी लाखो भाविक राज्यातून व परराज्यातून दर्शनासाठी येत असतात. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा पर्यटनासाठी देखील प्रसिद्ध आहे. नाशिक शहरालगत पुरातन महत्त्व असलेले सर्व धर्म मंदिर आहेत. तपोवन, काळा राम मंदिर, पंचवटी, पांडवलेणी, श्री त्रंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर, श्री सोमेश्वर मंदिर, रामकुंड, ब्रह्मगिरी, कुशावर्त तीर्थ, सटाणा तालुक्यात मांगीतुंगी मंदिर,

चांदवड तालुक्यातील चंद्रेश्वर, येवला तालुक्यात अंकाई-टंकाई किल्ले, मालेगाव शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ला, गाळणे किल्ला इत्यादी ऐतिहासिक व पौराणिक दृष्ट्या महत्वाची पर्यटन स्थळे देश विदेशी पर्यटकांना आकर्षित करतात. नाशिक जिल्ह्याची दुसरी महत्त्वाची ओळख म्हणजे हा जिल्हा औद्योगिक दृष्ट्या देखील महत्त्वाचा आहे. औद्योगीकरण हे प्रामुख्याने नाशिक तालुक्यात अधिक प्रमाणात झालेले आहे १९६२ मध्ये नाशिकमध्ये औद्योगिक वसाहतीची स्थापना झाली. म्हणजेच १९६२ मध्ये नाशिक इंडस्ट्रियल कोऑपरेटिव्ह ईस्टेट' ची स्थापना झाली. तसेच १९६४ मध्ये 'हिंदुस्तान एरोनेटीक लिमिटेडच्या एअरक्राफ्ट डिझाईन' ची स्थापना ओझर येथे झाली. यानंतर नाशिक शहरात व शहरालगत झपाट्याने औद्योगिक विस्तार होऊ लागला १९६८ मध्ये सातपूर औद्योगिक विकास महामंडळ, १९७५ मध्ये अंबड येथे दुसरे औद्योगिक क्षेत्र उदयास आले. आज नाशिक मध्ये मायको, एबीबी या विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या व महिंद्रा ही स्वदेशी बहुराष्ट्रीय कंपनी नाशिक मध्ये उत्पादन घेत आहे यासोबतच हजारो देशी-विदेशी लघु-मध्यम औद्योगिक कंपन्या उत्पादनाचे कार्य करीत आहेत.

जिल्ह्याची ओळख कृषी उत्पादनाच्या संदर्भात देखील आहे. नाशिकचे द्राक्ष विश्व प्रसिद्ध आहेत. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय केला जातो. नाशिक, निफाड, चांदवड, दिंडोरी, देवळा व बागलान या तालुक्यात प्रामुख्याने द्राक्षाचे उत्पादन घेतले जाते. तसेच कळवण, सटाणा, देवळा, मालेगाव, नांदगाव, येवला या तालुक्यात खरीप व रब्बी हंगामात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. या पिकाबरोबर जिल्ह्यात फळ-शेती, धान्य या संवर्गातील पिक, तेल बिया, भाजीपाला यांचे उत्पादन घेतले जाते. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत, येथे आशिया खंडातील सर्वात जुनी व मोठी कृषी बाजारपेठ आहे. नाशिक जिल्ह्यातील सर्व तालुक्यात सहकारी कृषी बाजार समित्या आहेत. त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांच्या कृषी मालाची खरेदी-विक्री केली जाते आहे.

१.४ संशोधनाची उद्दिष्टे :-

संशोधन कार्याला योग्य दिशा देण्यासाठी कांही महत्वपूर्ण उद्दिष्टे निश्चित केली आहेत ती पुढीलप्रमाणे.

१. नाशिक जिल्ह्यातील दारिद्रयाच्या स्थितीचा वास्तव स्वरूपात आभ्यास करणे.

२. दारिद्रयाचे पूर्ण पणे निर्मूलन का झाले नाही याचा शोध घेणे.
३. जागतिकीकरणानंतर २१ व्या शतकातील आर्थिक बदलांचा नाशिक जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यात राहणाऱ्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
४. शासकीय योजनांसाठी लाभार्थी निवड करण्याची प्रक्रिया जाणुन घेणे.
५. नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
६. शासकीय योजनांचा लाभ घेत आसलेल्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना मिळालेल्या लाभाचे तुलनात्मक मुल्यांकन करणे.
७. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी परिणामकारक उपाययोजना सुचवणे.

१.५ गृहीतकृत्य / उपकल्पना

१. नाशिक जिल्ह्यात दारिद्रयाचे प्रमाण सार्वत्रिक आहे.
२. नाशिक जिल्ह्यात दारिद्रयाचे प्रमाण प्रवर्ग निहाय विषम स्वरूपाचे आहे.
३. २१ व्या शतकात नाशिक जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे जीवनमान अधिक गुंतागुंतीचे व अनिश्चित झालेले आहे.
४. नाशिक जिल्ह्यात दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांची निवड योग्य पद्धतीने होत नसल्याने पात्र लाभार्थी शासकीय योजनेपासून वंचित रहात आहेत.
५. नाशिक जिल्ह्यात दारिद्रय रेषेखालील बहुतांश कुटुंबे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित आहेत.
६. नाशिक जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती निम्नस्तराची आहे.
७. शासकीय योजनांच्या लाभामुळे दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक परीस्थितीत परिवर्तन घडून येत आहे.
८. दारिद्रय रेषेखालील कर्त्या लोकसंख्येला शाश्वत रोजगार उपलब्ध होत नाही.

१.६ संशोधन पद्धती

संशोधन कार्यासाठी 'संशोधन पद्धती' हा महत्त्वाचा घटक असतो. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्याचे निश्चित केले आहे.

अ) प्राथमिक तथ्य संकलन :-

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीत प्रश्नावली, मुलाखत तंत्र, निरीक्षण तंत्र व गरजेनुसार अनुसूची चा वापर करून वास्तवदर्शी शास्वत माहिती संकलित करण्यात येईल.

आ) दुय्यम तथ्य संकलन :-

दुय्यम तथ्य संकलन पद्धती पूर्वप्रकाशित शासकिय अहवाल, विविध लेखकांची पुस्तके, वार्षिक अंक, शासकीय दस्तावेज, विविध मासिके, संशोधन प्रबंध, वर्तमानपत्रा मधील लेख इत्यादी चा आधार प्रस्तावित संशोधन कार्यासाठी घेतला जाईल. जेणेकरून प्रस्तुत संशोधन कार्य हे नाविन्यपूर्ण व उद्दिष्ट अनुरुप होईल.

इ) नमुना निवड पद्धती :-

संशोधनासाठी दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची नमुना निवड करताना 'साम्य' आणि 'भेद' या निकषांन्वये नाशिक जिल्ह्यातील तालुक्यांची दोन गटात विभागणी करण्यात येईल. दोन्ही गटातील प्रत्येकी दहा टक्के गावांची नमुना निवड करण्यात येईल. गावांची निवड करताना शहरानजीकची गावं, शहरापासून दूर अंतरावरील गावं, महामार्गावरील गावं, दूर अंतरावरील दुर्गम भागातील गावं. अशी विभागणी करून - प्रातिनिधिक गावांची निवड करण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येईल. निवड केलेल्या गावातील दारिद्र्य रेषेखालील पाच टक्के कुटुंबाची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येईल. तसेच निवड केलेल्या प्रातिनिधिक दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या प्राप्त माहितीच्या आधारे संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.

१.७ संशोधन प्रबंधाची रूपरेषा :-

संशोधनात पुढील प्रमाणे प्रकरणांची निर्मिती करण्याचे निश्चित केले आहे. या प्रकरणांमध्ये समाविष्ट करण्यात येणारे मुद्दे पुढील प्रमाणेः -

प्रकरण - १ प्रास्ताविक :-

दारिद्रयरेषा संकल्पना, दारिद्रयरेषेचे निकष, जागतिक दारिद्रयाची स्थिती, भारतातील दारिद्रयाची स्थिती, महाराष्ट्रातील दारिद्रयाची स्थिती, नाशिक जिल्ह्यातील दारिद्रयाची तालुकानिहाय वर्गवारी.

प्रकरण - २ नाशिक जिल्ह्याची सर्वसाधारण ओळख :-

नाशिक जिल्हा - पौराणिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी, नाशिक जिल्ह्याचे स्थान, क्षेत्रफळ व चतुःसिमा, नाशिक जिल्ह्याचे हवामान व पर्जन्य, शेतजमीन व पिक रचना, लोकसंख्येचा आकार आणि वृद्धी, उद्योग, व्यापार, वाहतूक व दळणवळण, सहकारी व वित्तीय संस्था, शैक्षणिक संस्था व आरोग्य सुविधा. यासंदर्भात विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण - ३ पूर्व संशोधनाचा आढावा :-

प्रस्तुत संशोधनाचे कार्य योग्य निकाष्याच्या आधारे दर्जेदार स्वरूपाचे व्हावे म्हणुन तसेच संशोधनाला योग्य दिशा मिळण्यासाठी पीएच. डी. संशोधन प्रबंध, एम.फील. संशोधन प्रबंध, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेतील लेख, शासकीय दस्तावेज व अहवाल आदींचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण - ४ संशोधन प्रणाली :-

अभ्यासाचे महत्त्व, समस्या सूत्रण व संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतकृत्ये, नमुना निवड, तथ्य संकलनाची साधने, तथ्यांचे विश्लेषण, संशोधनाच्या मर्यादा व प्रबंधाचा आकृतीबंध, इत्यादी घटकांच्या संदर्भात सविस्तर माहिती या प्रकरणात स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण - ५ दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची आर्थिक स्थिती :-

राहणीमान, उत्पन्न, खर्च प्रवृत्ती, रोजगार स्थिती, निवास स्थिती, शासकीय योजनांचा लाभ, स्थावर जंगम मालमत्ता, पशुधन, आदी. आर्थिक परिस्थितीची वास्तवदर्शी माहिती तालुकानिहाय व तुलनात्मक दृष्ट्या स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण - ६ दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची सामाजिक स्थिती :-

कुटुंबाचा आकार, साक्षरता, आहार व आरोग्य, धर्म, रूढी आणि परंपरा, व्यसनाधीनता व सामाजिक संघटन आदी, सामाजिक स्थितीची वास्तवदर्शी माहिती तालुकानिहाय व तुलनात्मकदृष्ट्या स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण - ७. निष्कर्ष व शिफारशी :-

या प्रकरणात संशोधनाअंती अभ्यासपूर्ण निष्कर्ष व वास्तव परिस्थितीत सुधारणा होण्याच्या दृष्टीने शिफारशी सुचविल्या जातील.

- **संदर्भसूची**

१. मराठी विश्वकोश खंड तीन चार आणि पाच तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, २००८

२. जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन नाशिक जिल्हा, महाराष्ट्र शासन, २०२०

३. Census of India 2011

४. 'संशोधन पद्धती प्रक्रिया व अंतरंग' पुणे विद्यर्थी गृह प्रकाशन, पुणे - डॉ. दु. का. संत

५. 'संशोधन पद्धतीशास्त्रे व तंत्रे', प्रदीप आगलावे. विद्या प्रकाशन, नागपूर २०००

६. 'संशोधन पद्धतीशास्त्र', डॉ. रा. र. बोरुडे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २००५

७. 'भारतीय अर्थव्यवस्था' प्रा. पी. आर. कुलकर्णी, पिंपळापूरे प्रकाशन, १९९२

८. 'पावर्टी एंड ब्रिटिश रुल इन इंडिया', दादाभाई नवरोजी, भारतीय कला प्रकाशन न्यू दिल्ली, २००६.

९. 'Dynamics of rural poverty, Sukhpal Singh, Anmol Publication Pvt. Ltd. Daryaganj, New Delhi, 1996.

१०. भारतीय अर्थव्यवस्था', रुद्र दत्त व के. पी. एस. सुंदरम, एस. चंद पब्लिकेशन दिल्ली, २००९.

११. 'Poverty in India' - Y. M. Dandekar and Neelkanth Rath, Indian School of Political Economy, Pune, 1971

१२. 'Poverty and planning in India - Rakshit Gangadhar. The World Press, Calcutta, 1977.

१३. 'Poverty in India - Gedam Ratnakar, Deep & Deep, New Delhi 1995.

१४. 'Unemployment, Technology and rural poverty", - Behari Bepin - 1983 New Delhi, Vikas.

१५. 'Poverty, Unemployment and Industries in Rural Areas', - R S Dave.- Khadigrmohyog, 31 (8), May, 1985.

१६. 'Growth and Poverty in Developing Countries', Montek Singh Ahluwalia- Washington, D.C. The World Bank, 1978.

१७. 'Poverty Alleviation Programs and Gram Panchayats. - SN Mishara. Mittal Publication, New Delhi 1997.

मार्गदर्शक
डॉ. अनिल दिगंबर वाडकर

संशोधक
श्री महादेव राजेंद्र क्षीरसागर